## ई-जलसेवा गीत

संगणकाच्या क्रांतीमधुनी साकारू या स्वप्न नवे
चला गड्यांनो आरंभू या जलसेवेचे पर्व नवे ।।धृ।।

शिवप्रभूच्या महाराष्ट्राची धुरा आम्ही वाहतो
इतिहासाच्या पानोपानी हीत जनांचे पाहतो
इतिहासाला साक्षी ठेऊनी गीत उद्याचे गाऊ नवे
चला गड्यांनो आरंभू या जलसेवेचे पर्व नवे ।।१।।

सोडून देऊ कासवगती ही नकोच नकारघंटा
जनतेचेच सेवक आम्ही का सेवेचा तोटा
जलसेवेस्तव जोडून घेऊ संगणकाशी नाते नवे
चला गड्यांनो आरंभू या जलसेवेचे पर्व नवे ।।२।।

ज्ञानेशाच्या बंधुत्वाचा भाव जाणुनी घेऊ
जनामनांच्या आकांक्षाचा ठाव जाणुनी घेऊ
दश कोटींच्या प्रश्नांसाठी उत्तर शोधू नित्य नवे
चला गड्यांनो आरंभू या जलसेवेचे पर्व नवे ।।३।।

पाणी म्हणजे जीवन गड्या जीवन म्हणजे पाणी
टपोरे थेंबामधुनी फुलती शिवारातली गाणी
सिंचित करण्या अवघी मायभू तंत्राचे बळ घेऊ नवे
चला गड्यांनो आरंभू या जलसेवेचे पर्व नवे ।।४।।

आम्ही मावळे सेवक असू कृष्णा भीमा गोदाईचे
खळखळणाऱ्या जलापरी गतीमान आम्हा व्हायचे
प्रगतीसाठी गती असू दे सूत्र जगाचे जाण नवे
चला गड्यांनो आरंभू या जलसेवेचे पर्व नवे ।।५।।

चंद्रकांत कुलकर्णी
स. अ. श्रेणी २
औरंगाबाद पाटबंधारे मंडळ

## क्षणचित्रे........



मास्टर ट्रेनर्सना संबोधित करतांना - टी.एन.मुंडे, अधीक्षक अभियंता



मा.श्रीमती मालिनी शंकर, सचिव (जलसंपदा व्यवस्थापन व लाक्षेवि) - संबोधित करतांना



मास्टर ट्रेनर ची पहिली बॅच - समारोप प्रसंगी



मास्टर ट्रेनर्स प्रशिक्षण सत्र मेटा नाशिक

## मास्टर ट्रेनर प्रशिक्षण - स्तुत्य उपक्रम




**विशाल खैरनार** सहाय्यक अभियंता श्रेणी २

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथील आय.सी.सी.आय.एस. अंतर्गत मास्टर ट्रेनर्सचे (बांधकाम कार्यप्रकार) प्रशिक्षणास नाशिक पाटबंधारे प्रकल्प मंडळ या कार्यालयाकडून मी सहभागी झालो होतो. सदरचे आयोजित केलेले प्रशिक्षण पूर्ण केल्यावर व प्रणालीबाबत संपूर्ण माहिती मिळाल्यानंतर आशा वाटते की, ई-जलसेवा प्रकल्प हा नक्कीच आपल्या जलसंपदा विभागाला नवीन दिशा देईल.

प्रशिक्षण देण्याची प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांची नाविन्यपूर्ण पध्दत खुपच प्रेरणादायी व कौतुकास्पद वाटली. या प्रशिक्षणामुळे मास्टर ट्रेनर्सचे एक प्रशिक्षक म्हणून मनोधैर्य वाढविण्यात निश्चितच उपयोग होईल. त्याच धर्तीवर ई-जलसेवा प्रणाली सद्यस्थितीत जलसंपदा विभागात महत्वपूर्ण परिवर्तन घडवून आणेल.

पुन्हा एकदा ई-प्रशासन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, विप्रो चे प्रशिक्षक, एन.आय.एस.जी. हैद्राबाद यांचे मनापासून अभिनंदन व धन्यवाद!

## An Innovative Training Approach



Gautam Deshpande, CM Specialist

As most of you know, the ICIS project is being driven by the PMO (Project Management Office) which consists of the Project Management Team which is looking after all the System Development and Domain related issues, and the Change Management Team which handles all the people related issues, the training and communication activities.

Change Management is one of the most crucial activities in dealing with an ambitious project of this magnitude, however, most people always wonder 'What is Change Management?'. And no it is not the change of management!! (One of the responses we received on asking this question). 'Change Management is the process of continually renewing an organisation's direction, structure and capabilities to serve the ever-changing needs of external and internal customers', Morgan and Brightman (2000, p. 66), which, in this case is also directly related to the vision of the ICIS project. The change management process runs in tandem with the project development and execution.

Think about it, to execute a project like ICIS, there are several questions which need to be and have been asked, 'Are we (the employees) ready for such a system?' being the most obvious one.



मास्टर ट्रेनर्स प्रशिक्षण सत्र मेटा नाशिक

So, are we? Can we (the department/employees) achieve the required level of behavioural and mindset change to make this project successful? We know that computerisation is the need of the hour. Everything around us is now computerized. We ourselves expect speedy, cost effective and quality service from all the organizations that we deal with, be it banks or mobile operators or others. Then shouldn't we, as part of a government undertaking, also provide the same to our stakeholders?

The Change Management (CM) Team performs several interventions and initiatives to ensure that the employees of WRD are well versed with the ICIS project and ready to help implement it successfully. These initiatives include several awareness workshops which we have been conducting at various districts (and will continue to do so), the design and development of various communication media like brochures and posters (including the eJalseva logo) which will promote the project, communications to stakeholders through paperless media like emails and text messages (to the extent that we hardly send hard copies of any communication) in the spirit of the project, planning, designing and implementing the various training programs held for the employees including the recently launched Master Trainers Training Program, the first batch of which, were successfully trained on the ICIS System's Construction Modules, between the 15th and 26th of April'13, at META Nashik.

It is now these Master Trainers, who along with the already established eChamps, CPMT's & RPMT's, will act as the extended arms of the CM Team to successfully drive this project. However, to achieve true success the CM Team calls upon you, the employee to understand the various benefits that ICIS will provide to all the stakeholders, especially you, and imbibe it as your own system, created for you, and not only use the system in your daily work, but to help us drive it throughout MWRD!

## Successful Go-live



Wg. cdr. (Retd.) A.K.Srinivas, Project Management Consultant (PMO)

At last the day has come for us to launch 19 modules of our ICIS project across the state on 01 May 13. It's an important milestone as far as PMO is concerned. I thank each and every one of you for your support in making the project reach this stage. Let me remind all of you that partial go live does not mean that the product is acceptable in all respects, this only means more and more of you are going to come on board and port your data and try and generate reports and see the utility of the product. There are lot of things one needs to carry out before we declare the project is good in all respects. This is version-1 of the product and we are aiming to go ahead with version -2 in days to come that would be our main stay product.

I had an opportunity to interact with all the first batch of Master trainers at META recently, and was greatly surprised at their enthusiasm and the way they pledged to carry out their task of training as many of you sooner in your offices or at appropriate venues.

Things are working out as planned at PMO with support from one and all and I wish we all would make leaps and bounds in this regard and show case to the world that we can do best and will create a history in coming days.



मास्टर ट्रेनर्स प्रशिक्षण सत्र मेटा नाशिक

## मास्टर ट्रेनर प्रशिक्षण – एक सुखद अनुभव......



मृणाल कुलकर्णी, सहाय्यक कार्यकारी अभियंता, रत्नागिरी

महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक येथील दिनांक १५/४/२०१३ ते २६/४/२०१३ या कालावधीतील आय.सी.सी.आय.एस. अंतर्गत मास्टर ट्रेनर्सचे (बांधकाम कार्यप्रकार) प्रशिक्षणात दक्षिण कोकण पाटबंधारे प्रकल्प मंडळ या कार्यालयाकडून मी सहभागी झाले होते. सदर प्रशिक्षणाचे ई–प्रशासन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालय, पुणे यांनी अतिशय चांगल्या प्रकारचे नियोजन केले होते. मा.श्री. टी.एन.मुंडे, अधीक्षक अभियंता व श्री. दाभाडकर, कार्यकारी अभियंता तसेच त्यांचे सहकारी श्री. कदम व श्री. पाटील यांनी प्रशिक्षण कालावधीत प्रत्येक प्रशिक्षणार्थीस स्वतंत्र संगणकासह १० एमबीपीएस ची इंटरनेट सुविधा उपलब्ध करून दिली होती. विप्रोचे श्री. चैतन्य सर यांनी आम्हाला एम–६, एम–७, एम–८ या बांधकाम कार्यप्रकारातील मोड्यूल्सचे चांगल्या प्रकारचे प्रशिक्षण दिले. प्रत्येकास वैयक्तिकरित्या सगळ्या मोड्यूल्सची संगणकावर प्रात्यक्षिके करावयास मिळाली. श्री. दाभाडकर यांनी युनिकोड व लीनक्स ऑपरेटींग सिस्टीम बद्दल आम्हाला उत्तम मार्गदर्शन केले. आय.सी.आय.एस. प्रकल्पाचे यश हे त्यांच्या वापरकर्त्यांच्या सहभागावर अवलंबून असल्यामुळे ई–प्रशासन व्यवस्थापन कार्यालय पुणे यांनी आमच्यावर अधिकाधिक तांत्रिक अधिकाऱ्यांना सदर प्रकल्पाच्या माहिती प्रणालीचे प्रशिक्षण देण्याची जबाबदारी सोपविली आहे ती आम्ही चांगल्या प्रकारे पार पाडू. आय.सी.आय.एस. बुलेटिन या ई–न्यूज लेटरच्या द्वितीय वर्धापनदिनास मन:पूर्वक शुभेच्छा !

## माहिती प्रणालीतील समाविष्ट मोड्युल्स्

| मोड्युल क्र. | मोड्युलचे नाव |
|---|---|
| एम ० | जलसंपदा विभागाचे संकेत स्थळ (पोर्टल) |
| | **प्रकल्प अन्वेषण** |
| एम १ | प्रकल्प अन्वेषण व मान्यता |
| एम २ | जलविज्ञान माहिती संग्रह |
| | **संकल्पन** |
| एम ३ | संकल्प चित्र |
| एम ४ | सल्लागार सेवा |
| एम ५ | छोटे जलविद्युत प्रकल्प |
| | **बांधकाम** |
| एम ६ | भूसंपादन, पुनर्वसन, वन, पर्यावरण व केंद्रीय जल आयोग मान्यता |
| एम ७ | अंदाजपत्रक व प्रारूप निविदा |
| एम ८ | बांधकाम व कंत्राट व्यवस्थापन |
| एम ९ | यांत्रिकी यंत्रणेमार्फतची कामे |
| एम १० | एम.आय.बी.पी. प्रकल्पांचे संनियंत्रण |
| एम ११ | गुणनियंत्रण व निरीक्षण |
| | **देखभाल व दुरूस्ती** |
| एम १२ | धरण सुरक्षा / संनियंत्रण |
| एम १३ | पाटबंधारे प्रकल्प देखभाल व दुरूस्ती |
| एम १४ | जलनि:सारण |
| एम १५ | पूर नियंत्रण व आपत्ती व्यवस्थापन |
| | **सिंचन व्यवस्थापन** |
| एम १६ | पाणी वापर संस्था व लाभक्षेत्र निश्चिती |
| एम १७ | पाणी हक्क दारी |
| एम १८ | जलाशयातून पाणी सोडण्याचे कार्यक्रम |
| एम १९ | आकारणी व वसूली |
| एम २० | जल लेखा व स्थिर चिन्हांकन |
| | **प्रशिक्षण** |
| एम २१ | प्रशिक्षण |
| एम २२ | व्यावसायिक परीक्षा |
| | **संशोधन** |
| एम २३ | सामुग्री/मृदा/लोह/संधानक चाचणी |
| | **सहाय्यकारी कार्य प्रकार** |
| एम२४ | मासिक लेखा |
| एम २५ | लेखा परिक्षण, भांडार पडताळणी, कार्यालय तपासणी |
| एम २६ | विधानसभा/ लोकसभा तारांकित–अंतारांकित प्रश्न |
| एम २७ | माहितीचा अधिकार |
| एम २८ | मालमत्ता व्यवस्थापन |
| एम २९ | न्यायालयीन प्रकरणे व लवाद व्यवस्थापन |
| एम ३० | बैठक व्यवस्थापन |
| एम ३१ | ग्रंथालय व्यवस्थापन |
| एम ३२ | तक्रार निवारण |
| एम ३३ | निरीक्षणगृहे/ विश्रामगृह आरक्षण |

दि. १/५/२०१३ रोजी ई जलसेवा प्रकल्पांतर्गत Go-Live कार्यान्वित करण्यात आला आहे. सदर टप्प्यामध्ये एकूण १९ मोड्युल्स कार्यान्वित होणार असून त्यांची यादी खालील प्रमाणे.

१. एम ० : जलसंपदा विभागाचे संकेतस्थळ
२. एम १ : प्रकल्प अन्वेषण व मान्यता
३. एम ३ : संकल्पचित्र
४. एम ४ : सल्लागार सेवा
५. एम ५ : छोटे जलविद्युत प्रकल्प
६. एम ७ : अंदाजपत्रक व प्रारुप निविदा
७. एम ८ : बांधकाम व कंत्राट व्यवस्थापन
८. एम ९ : यांत्रिकी यंत्रणेमार्फतची कामे
९. एम १० : ए.आय.बी.पी. प्रकल्पांचे संनियंत्रण
१०. एम ११ : गुणनियंत्रण व निरीक्षण
११. एम १२ : धरण सुरक्षा/संनियंत्रण
१२. एम २१ : प्रशिक्षण
१३. एम २२ : व्यवसायिक परीक्षा
१४. एम २६ : विधानसभा/ लोकसभा तारांकित–अतारांकित प्रश्न
१५. एम २७ : माहितीचा अधिकार
१६. एम ३० : बैठक व्यवस्थापन
१७. एम ३१ : ग्रंथालय व्यवस्थापन
१८. एम ३२ : तक्रार निवारण
१९. एम ३३ : निरीक्षण गृहे/ आरामगृहे आरक्षण

प्रणालीबाबत ठळक माहिती खालील प्रमाणे आहे.

- जलसंपदा विभागाच्या संकेत स्थळाची URL :
  मोड्युल एम ० हे जलसंपदा विभागाचे संकेतस्थळ असून त्याची लिंक खालील प्रमाणे राहील. https://wrd.maharashtra.gov.in
- Login करण्यासाठी आवश्यक असणाऱ्या कार्यालय निहाय Login IDs ची यादी यापूर्वीच कळविण्यात आली आहे.
- प्रणाली संबंधी मोड्युल निहाय User Manual प्रणालीच्या Knowedge Store मध्ये उपलब्ध आहेत.

## *ICIS News & appeal*

- UAT - 3 of all modules completed
- Go live for 19 modules.
- Master Trainers Training 1st batch completed.
- Master Trainers 2nd batch will start from 6th May 2013.
- Agreement with BSNL for 2mbps line for offices is completed.
- Go live for remaining modules within next two months.

### Be an ICIS e-news author......

We at ICIS e-news letter offer an opportunity to our readers to contribute articles and be a part of a family of ICIS e-news author. In particular, we will appreciate receiving contributions on articles bearing on innovative approach in e-governance, development and use of software in day to day department activities.

